**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांक:05.11.2024** **वार:मंगळवार**

---

1. राज्यातल्या 288 विधानसभा मतदारसंघात 4 हजार 140 उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात
2. अनेक मतदारसंघातली बंडखोरी रोखण्यात महायुती आणि महाविकास आघाडीला यश; तर अनेक ठिकाणी बंडखोरांचं बंडाचं निशाण कायम
3. राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांची बदली/ मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसळकर यांच्याकडे कार्यभार आणि
4. एफटीआयआयच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या लघुपटाला ऑस्कर पुरस्कारांच्या लाइव्ह ॲक्शन शॉर्ट फिल्म प्रकारात नामांकन

उमेदवारी माघार

राज्यात 20 नोव्हेंबरला होणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठीचं चित्र स्पष्ट झालं आहे. यंदा विधानसभा निवडणुकीसाठी 4 हजार 140 उमेदवार रिंगणात आहेत. राज्यातल्या 288 मतदारसंघात 7 हजार 78 उमेदवारांचे अर्ज वैध ठरले होते; उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या कालच्या शेवटच्या दिवसापर्यंत 2 हजार 938 उमेदवारांनी अर्ज मागे घेतले. अनेक मतदार संघातली बंडखोरी रोखण्यात महायुती आणि महाविकास आघाडीला यश आलं आहे; त्याचवेळी अनेक ठिकाणी बंडखोर उमेदवारांनी आपले अर्ज कायम ठेवल्याने तिथे चुरस निर्माण होण्याची शक्यता आहे. ऐकुया याबाबतचा वृत्तांत....

**कोल्हापूर उत्तर मतदारसंघात काँग्रेसच्या अधिकृत उमेदवार मधुरिमा राजे यांनी अखेरच्या क्षणी अर्ज मागं घेतला. राजेश लाटकर यांची उमेदवारी रद्द करुन काँग्रेसनं त्यांना उमेदवारी दिली होती. मात्र लाटकर माघार घ्यायला तयार झाले नसल्यानं शेवटच्या 10 मिनिटात मधुरिमाराजे यांनीच अर्ज मागे घेतला. भाजपाचे माजी खासदार गोपाळ शेट्टी, रत्नागिरी विधानसभा मतदारसंघातले शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते उदय बने, मोहोळमधले राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सिद्धी कदम आणि रमेश कदम यांनीही आपले उमेदवारी अर्ज मागे घेतले आहेत.**

**नाशिक जिल्ह्यातून काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या डॉ. हेमलता पाटील, तसंच राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष रंजन ठाकरे, भाजपाचे बंडखोर नेते शशिकांत जाधव आणि दिलीप भोसले, शिवसेनेचे धनराज महाले यांनी अर्ज मागे घेतले. नागपूर ग्रामीणच्या उमरेड मतदारसंघातून माजी आमदार राजू पारवे यांनी आपला अर्ज मागे घेतला. नाशिक जिल्ह्यात समीर भुजबळ, निर्मला गावित यांची उमेदवारी कायम आहे. राजापूरमधून काँग्रेसच्या अविनाश लाड यांनी उमेदवारी अर्ज कायम ठेवला आहे.**

जागावाटपाबद्दल शेतकरी कामगार पक्षाशी चर्चा झाली असून उरणची जागा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष लढवेल, तर अलिबाग, पेण आणि पनवेलमधून शेकापचे उमेदवार निवडणुकीत उतरतील, अशी माहिती उद्धव ठाकरे यांनी दिली. माहिम विधानसभा मतदार संघात मनसेचे अमित ठाकरे यांना महायुतीचा पाठिंबा देण्याची भूमिका भाजपानं घेतली होती. मात्र तिथून शिवसेनेचे सदा सरवणकर निवडणूक रिंगणात कायम आहेत.

उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशी महाविकास आघाडीला पुणे शहरात बंडखोरी रोखण्यात अपयश आलं. काँग्रेस नेते आणि माजी उपमहापौर आबा बागुल यांनी पर्वती विधानसभा मतदारसंघातून अपक्ष म्हणून भरलेला अर्ज कायम ठेवला आहे. त्यामुळे आता पर्वती मतदारसंघामध्ये भाजपाच्या माधुरी मिसाळ, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या अश्विनी कदम आणि अपक्ष आबा बागूल अशी तिरंगी लढत होणार आहे.

कसबा विधानसभा मतदारसंघात काँग्रेसच्या माजी महापौर कमल व्यवहारे यांनी आपला उमेदवारी अर्ज कायम ठेवला आहे. मात्र काँग्रेसचे बंडखोर उमेदवार मुख्तार शेख यांची बंडखोरी शमवण्यात काँग्रेसला यश आलं आहे. मुख्तार शेख यांनी आपली उमेदवारी माघारी घेत पक्षाचे अधिकृत उमेदवार रविंद्र धंगेकर यांना पाठिंबा दिला आहे. त्यामुळे कसबा मतदार संघात काँग्रेसचे रवींद्र धंगेकर, भाजपाचे हेमंत रासने, मनसेचे गणेश भोकरे आणि कमल व्यवहारे अशी चौरंगी लढत पाहायला मिळणार आहे.

शिवाजीनगरमध्ये काँग्रेसचे मनीष आनंद यांनी अपक्ष म्हणून आपली उमेदवारी कायम ठेवली आहे. या मतदारसंघातून काँग्रेसचे दत्ता बहिरट आणि भाजपचे सिद्धार्थ शिरोळे निवडणूक लढवत आहेत. चिंचवडमध्ये महायुतीचा घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे माजी नगरसेवक नाना काटे यांनी बंडखोरी केली होती. मात्र काटे यांनी काल माघार घेतली. पुण्यातील दौंड विधानसभा मतदार संघात राष्ट्रवादी काँग्रेसचे वीरधवल जगदाळे यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला आहे. तर खेड आळंदी विधानसभा मतदार संघात राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते अतुल देशमुख यांनी माघार घेतली आहे. या मतदार संघात महाविकास आघाडीचे उमेदवार बाबाजी काळे विरुद्ध महायुतीचे उमेदवार दिलीप मोहिते पाटील यांच्यात लढत होणार आहे.

मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी विधानसभा निवडणुकीतून माघार घेतली आहे. आपल्या सर्व उमेदवारांना अर्ज मागे घेण्याचं आवाहन त्यांनी केलं. मित्रपक्षांनी उमेदवारांची यादी पाठवली नसल्यामुळे माघार घेत असल्याचं, त्यांनी काल जालना जिल्ह्यात आंतरवाली सराटी इथं बातमीदारांना सांगितलं. आकाशवाणी बातम्यांसाठी आमच्या ठीकठिकाणच्या बातमीदारांसह मनोज क्षीरसागर पुणे.

**महशक्ती-नागपूर**

विधानसभा निवडणुकीसाठी परिवर्तन महाशक्ती आघाडीनं 121 उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. छत्रपती संभाजीराजे, बच्चू कडू, राजू शेट्टी, वामनराव चटप, धनंजय जाधव यांच्यासह अनेक समविचारी नेत्यांची नागपूर इथं बैठक झाली. या बैठकीत ही यादी जाहीर करण्यात आली. कसलाही वाद न होता जागावाटप पूर्ण झालं असल्याचं छत्रपती संभाजीराजे यांनी सांगितलं.

**प्रचार**

विधानसभा निवडणुकीसाठी विविध मतदारसंघातलं लढतीचं चित्र स्पष्ट झाल्यानंतर आता राज्यभरात प्रचाराची रणधुमाळी सुरू होणार आहे. येत्या काही दिवसात भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी तसंच कॉंग्रेसचे नेते

राहुल गांधी यांच्या प्रचार सभा राज्यात विविध ठिकाणी होणार आहेत. सर्वच पक्षांच्या राज्यातल्या दिग्गज नेत्यांच्या प्रचारसभांचा धडाकाही आता सुरू होईल.

**<u>रश्मी शुक्ला-मुंबई</u>**

राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांची तात्काळ बदली करण्याचे आदेश केंद्रीय निवडणूक आयोगानं काल दिले. काँग्रेस आणि इतर पक्षांच्या तक्रारीनंतर आयोगानं ही कारवाई केली आहे. त्यानंतर पोलीस महासंचालक पदाचा कार्यभार मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसळकर यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. नवीन महासंचालकांच्या नियुक्तीसाठी तीन वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्यांची नावं पाठवण्याचे निर्देश निवडणूक आयोगानं राज्याच्या मुख्य सचिवांना दिले आहेत. निवडणूक आयोगाच्या या आदेशाचं काँग्रेसनं स्वागत केलं आहे. पण रश्मी शुक्ला यांना हटवण्यासाठी एवढा उशिर का लागला? असा प्रश्न काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. रश्मी शुक्ला यांच्या बदलीचा निर्णय अतिशय योग्य असल्याची प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी दिली आहे. रश्मी शुक्ला यांच्या कार्यकाळाला मुदतवाढ देण्यावरून नाना पटोले यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर बेछूट आरोप केले. मात्र, त्यांना त्याचे पुरावे द्यावे लागतील. पुरावे नसतील तर पटोले यांच्या विरुद्ध आम्ही निवडणूक आयोगाकडे तक्रार करू, असं भाजपाचे मुंबई अध्यक्ष आशीष शेलार यांनी सांगितलं.

**<u>FTII- ऑस्कर नामांकन</u>**

पुण्याच्या भारतीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्थेच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या Sunflowers Were the First Ones to Know या लघुपटाला ऑस्कर पुरस्कारांच्या लाइव्ह ॲक्शन शॉर्ट फिल्म या प्रकारात नामांकन मिळालं आहे. चिदानंद नायक याचं दिग्दर्शन असलेल्या या चित्रपटानं यंदाच्या कान चित्रपट महोत्सवात 'ला सिनेफ' विभागात प्रथम पुरस्कार पटकावला होता. ऑस्कर नामांकन जाहीर झाल्यानंतर आकाशवाणीकडे आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना लघुपटचा दिग्दर्शक चिदानंद नायक म्हणाला....

**<u>गोखले</u>**

पुण्याच्या गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेचे कुलगुरु डॉ. अजित रानडे यांनी पदाचा राजीनामा दिला आहे. वैयक्तिक कारणामुळे आपण राजीनामा देत असल्याचं डॉ. रानडे यांनी कुलपती संजीव सन्याल यांना लिहिलेल्या पत्रात म्हटलं आहे. मात्र, या पदासाठी आपल्या अर्हतेत उणीव होती असा या राजीनाम्याचा अर्थ नाही असं त्यांनी स्पष्ट केलं आहे. डॉ. रानडे यांच्या कुलगुरुपदाच्या नियुक्तीवरुन अलिकडेच मोठा वाद झाला होता, त्यानंतर न्यायालयाच्या आदेशानुसार त्यांनी पदभार पुन्हा स्वीकारला होता.

**<u>हवामान</u>**

राज्यात सर्वत्र आज हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं; नमस्कार.